# प्रकरण चौथे

## 'कर्कोटक' या कथासंग्रहाचा आशय आणि अभिव्यक्तिदृष्ट्या विचार

## प्रकरण चौथे

## 'कर्कोटक' या कथासंग्रहाचा आशय आणि अभिव्यक्तिदृष्ट्या विचार

'कर्कोटक' ही कथा तरुण इंजिनिअरची आहे. शिक्षणासाठी विलास फ्लोरिडाला जातो. फ्लोरिडाचे वातावरण, तेथे भेटलेली वेगवेगळ्या प्रवृत्तीची माणसे या कथेत चित्रित केली आहेत. विलास मूळचा कोकणचा आहे. त्यामुळे कोकणाबद्दलची आस्था त्याच्यात दिसून येते. कोकणातील निसर्ग सतत त्याच्या मनाला भुरळ घालतो. त्याच्या गावातील मल्लिकार्जुनचे देऊळ आहे. त्या देवळाबद्दल भीतियुक्त आदर आहे. पण हेच देऊळ जर अमेरिकेत असते तर ते पर्याटन केंद्र बनले असते. अशी कितीतरी देवळे भारतात आहेत; पण ती उपेक्षित आहेत. याची विलासला खंत वाटते. विलासला खात्री आहे की, आपण कोकणात राहिलो असतो; तर परिस्थितीशी झगडण्यात आपली बुद्धी कुजली असती. विलासला परदेशात गेल्यावर लिडा नावाची मुलगी भेटते. ती रेड इंडियन आहे. लिडा चित्रकार आहे आणि ती उदरनिर्वाहासाठी स्टोअरमध्ये काम करते. लिडाला तिच्या मैत्रिणी घरी घेऊन जात नाहीत. कारण ती रेड इंडियन आहे म्हणून, तिला हीनपणाची वागणूक दिली जाते. याचा तिला राग येतो. लिडा विलासबरोबर 'इंडियन शॉप' बघायला जाते. त्यावेळी विलासला म्हणते, ''रानटी कोण आणि सुधारलेलं कोण ते सांगणं सोपं नाही.''[१] लिडाची आजी रेडइंडियनबद्दल अभिमानाने सांगते की, एकदा आपल्या आयुष्याचा जोडीदार निवडला की, त्याला जन्मभर इमान देणारी ही जमात होती. स्त्रीच्या रक्षणासाठी रक्त सांडणारे

पुरुष या जमातीत होते आणि ते प्राणाचीही पर्वा करत नव्हते अशा "सरळ मनाच्या लोकांना रानटी म्हणण्याचा आजच्या स्वैराचारी पिढीला कितीसा अधिकार आहे ?"[२] असा प्रश्न लिडा विचारते.

विलासचे शिक्षण पूर्ण झाल्यावर भारतात जायचे की नाही या द्विधा मन:स्थितीत विलास असतो. त्यावेळी त्याने ऐकलेल्या कीर्तनाची आठवण होते. त्या कीर्तनात सिद्धेबुवा म्हणतात, "वासनेच्या कालसर्पाने डंख मारला, मनात मोहाचे प्रलोभनाचे कालकूट ओतले गेले की, ते काढता येत नाही."[३] यावरून वासना व मोह यांपासून आपण दूर राहिले पाहिजे हे लक्षात येते. यासाठी सिध्देबुवा देवयानी व कच यांचे उदाहरण देतात- "साक्षात देवयानी लुब्ध झाली असता वासना सर्पाला दूर ठेवणारा आणि संजीवनी प्राप्त करण्यावर लक्ष एकवटणारा एखादाच कच या जगात असतो."[४] ह्या उदाहरणावरून एवढेच सांगायचे आहे की, आपण आपल्या ध्येयावर लक्ष ठेवले पाहिजे आणि आपले ध्येय पूर्ण होताच मागे फिरायला पाहिजे.

'दि रॅट रेस' या कथेत कंपनीतील चढाओढ चित्रित केली आहे. कंपनीत स्थान टिकवायचे तर फक्त मेरिट असून चालत नाही. याचा अनुभव असणारा मनी या कथेत भेटतो. उदरनिर्वाहासाठी वाटेल ते काम करण्याची मनीची तयारी होती. इंजिनिअरिंगच्या डिप्लोमा व्यातिरिक्त त्याच्याकडे काहीच नव्हते. मनीची नोकरी साधी होती. त्याचेही दिवस पालटले. त्याला चांगल्या पगाराची नोकरी लागली. मनीची पोस्ट वाढत गेली. मनी एल. ॲन्ड. एम.मध्ये 'सर्व्हिसेस' या विभागात काम करत होता. त्याच्यावर शिवदासनी हा साहेब होता.

शिवदासनी व्यसनी, चैनी असल्याकारणाने साऱ्या कामाचा भार मनीवर येत होता. एस्टॅब्लिशमेंटमधील लोकापूरकर व एम. डी. यांच्यात वाद झाला होता. लोकापूरकर ती नोकरी सोडून जाणार होते. हा एस्टॅब्लिशमेंट विभाग सर्वांनाच नको असतो. या विभागात जबाबदारी भरपूर आणि फायदा काहीच नसतो. एम. डी. ला डायरेक्टर्सनी झापले. एम. डी. च्या डोक्यात दोन संकल्पना आल्या. एक म्हणजे 'एकॉनॉमी ड्राइव्ह' या कल्पनेत कामगारांच्यावर कुऱ्हाड पडते. हा क्षण मोठा नाजूक असतो. स्वत:चे पुढारीपण टिकवायचे असेल तर भाषा उग्र वापरायची. पण संप होऊ द्यायचा नाही. संप झालाच तर त्याचा फटका कामगारांना बसतो. दुसरी संकल्पना म्हणजे 'सर्व्हिसेसकडचा' एक सिनिअर माणूस एस्टॅब्लिशमेंटला पाठवायचा. या दुसऱ्या संकल्पनेने मनी बावरला. कारण त्याला माहीत होते कुऱ्हाड पडली तर ती मनीच्याच डोक्यावर असणार. बळी जाणारच तर तो माझा नसून दुसऱ्याचा असावा असे मनीला वाटते. म्हणून शिवदासनी हा मनीपेक्षा कामात कमी असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न करतो. शिवदासनी मनीवर अवलंबून असल्यामुळे शिवदासनीला कामात मदत करत नाही. त्याला फिगर देत नाही. पण शिवदासनी पंजनानीला घाबरून अगोदरच फाईल घरी घेऊन जातो व फिगर तयार करतो. शिवदासनी त्याची कामे पूर्ण करून ठेवतो.

या कथेत कंपनीतील चढाओढ चित्रित केली आहे. दुसरा आपल्यापेक्षा कसा खालचा आहे हे दाखविण्याचा प्रयत्न या कथेत मनी करतो. म्हणून या कथेला ' दि रॅट रेस' हे शीर्षक योग्य आहे. यातून माणसाची प्रवृत्ती दिसून येते.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

'लाट' या कथेतील जानकी ही बॉम्बे कंपनीत व्ही. आय. पी. आहे. ती स्वयंभू आहे. तिला आधुनिक गोष्टीबद्दल आवड आहे. तशीच ती कलासक्त आहे. तिच्याजवळ खोटे बोललेले चालत नव्हते. दीड वर्षापूर्वी मुलाखत घेताना भार्गव तिला अपेक्षित उत्तर देतो. जानकी भार्गववर खूष होते. भार्गवला ती नोकरीची ऑफर देते. कारण जानकीला मुंबईची टीम उत्तम बनवायची होती. त्यामुळे भार्गवसारख्या हुशार मुलाला ती जाऊ देणार नव्हती. भार्गवला नोकरीत 'सेल्स आणि सर्व्हिस'चे तंत्र चांगले जमू लागले होते. जानकीच्या मनात भार्गवबद्दल आकर्षण निर्माण झाले होते. तिच्यात होणाऱ्या बदलावरून भार्गवच्या लक्षात आले होते. जानकी एक दिवस मीटिंग झाल्यावर भार्गवला घरी घेऊन जाते; त्यावेळी जानकीच्या ठिकाणी असणाऱ्या कलासक्ततेचा अनुभव त्याला येतो. जानकी कर्तबगार आहे. तशीच ती वास्तवात जगणारी स्त्री आहे. तिच्या ठिकाणी असणारी विनोदी वृत्ती पाहयला मिळते. जानकीचे लग्नाचे वय होऊन गेले असले तरी भार्गवबद्दल तिला आकर्षण वाढत चालले होते. तिला सतत वाटत होते की, तिच्यातील आणि भार्गवमधील अंतर गळेल आणि भार्गव तिचा होईल. अचानक अजिता सिंगचा फोन येतो. कंपनीच्या शेजारी असणाऱ्या नूतन इलेक्ट्रॉनिक्समध्ये ट्रॅजेडी घडली आहे. तिला भार्गवची काळजी वाटते म्हणून अजिताने फोन केला होता. अजिताचा फोन म्हटल्यावर भार्गवचा उजळलेला चेहरा पाहून जानकीला वाईट वाटते. भार्गववर लुब्ध झालेल्या अजिताविरुद्ध जानकीचा निभाव लागणार नाही असे जानकीला वाटते. ''उसळणाऱ्या लाटांचा जोर कमी व्हावा आणि सागर

शांत शांत होत जावा तशी जानकीची स्थिती होते.''

जानकीच्या जीवनात आलेली सुखाची लाट लगेच पाण्यात विरून गेल्याची दिसते. मानवी जीवन कसे असते याचे वास्तववादी चित्रण या कथेत येते. मानवी जीवनाला दु:खाची किनार असतेच हे येथे दाखवून दिले आहे.

'मृगया' या कथेत दोन पिढीतील अंतर दाखविण्याचा प्रयत्न अनंत मनोहरांनी केला आहे. आनंदी व जयवंत शिर्के कुटुंबासह अमेरिकेत राहतात. जरी अमेरिकेत राहत असले तरी आनंदी व जयवंत हे भारतीय संस्कृती विसरलेले नाहीत. त्यांना केशर व किशोर ही दोन मुले आहेत. ती दोघेही आधुनिक विचारसरणीची आहेत. त्यामुळे त्यांना आई-वडलांची मते बुरसटलेली आहेत असे वाटते. केशर मोठी झाल्यावर आजूबाजूच्या संस्कृतीविषयी तिला उत्सुकता वाटू लागते. ती आईला सतत प्रश्न विचारते, ''आई, डेटिंग म्हणजे काय ?'' त्यावेळी आई तिला थातूरमातूर उत्तर देऊन टाळत असे. केशरच्या मित्राने पार्टी दिली. त्या पार्टीत फिशपाँडचा कार्यक्रम होता. केशरवर फिश टाकला तो असा : ''इंडियन फ्लॉवर इन अमेरिकन गार्डन : टच मी नॉट.'' [५] यावर केशर मिश्किलपणे हसते. पण ती मनातून नाराज होते.

केशर मोठी झाली आहे याची जाणीव आईला होताच तिच्यावर लक्ष ठेवायला पाहिजे असे आनंदीला वाटते. तिला लगेच भारतातील आपल्या घरच्या लोकांची आठवण होते. आपण केशरच्या वयाचे असताना कसे वागत होतो, आपल्यावर लक्ष द्यायला घरातील सगळी मंडळी होती. आता केशरवर लक्ष द्यायला कोणी नाही याचे आनंदीला

वाईट वाटते. जयवंत व आनंदी केशरच्या लग्नासाठी स्थळ शोधायला लागतात. केशरला आवडणारा एकही मुलगा त्यांना आवडत नाही. केशरचे लग्न ठरविण्यासाठी जयवंत, आनंदी व केशर भारतात येतात. केशरला लग्न ठरविण्याची भारतीय पद्धत रानटीपणाची वाटते. पाच मिनिटाच्या बैठकीत आयुष्याचा जोडीदार निवडणे हे केशरला पटत नाही.

स्थळ बघताना केशरला कडू अनुभव येतात. नाशिकला गेल्यावर केशरला खाली वाकून भारतीय पद्धतीने नमस्कार करता येत नाही म्हणून तिथल्या बायका तिला हसतात. "एवढी अमेरिकेत राहिली पण रंग बदलला नाही." असा शेरा केशरला मिळाला. त्यामुळे तिला राग येतो. एका स्थळाबरोबर नवऱ्या मुलाचे मित्र आले होते. त्याची चर्चा ऐकून तिला वाईट वाटते. ते म्हणते होते, "नाशिकापर्यंत थेट अमेरिकेतून नवरा शोधत आहेत. काहीतरी भानगड आहे. दोन एकरात द्राक्षांची लागवड करायला पैसा बघ मिळतोय का." [६] यावर मुलगा खुशीने हसला होता. अशा स्वार्थी लोकांचा केशरला राग येतो. नाशिकवरून परत येताना गाडीत केशरजवळ एक सावळा मुलगा बसला होता. त्याचे नाव विजय होते. तो बी. ई. करत होता. घरची परिस्थिती गरीब आहे. मूळचा रत्नागिरीचा आहे. विजय व केशर यांच्यात संभाषण होते. त्यावेळी विजयला अमेरिकेचे कुतूहल त्याच्या डोळ्यात दिसते. त्याच्या चौकसबुद्धीवर केशर भाळते. जयवंत विजयबद्दल माहिती मिळवतात. केशरच्या लक्षात येते की, वडलांचे डोळे चमकले आहेत. हे पाहून तिने मनाशी होरा बांधला. वडील कोकणात जातील, मोकळेपणाने लग्नाची बोलणी करतील. केशर विजयकडे निराळ्या दृष्टीने पाहू

लागते. आपण विजयला माणूस म्हणून आवडलोय का ? याचा विस्तार ती करू लागते.

दोन पिढीतील अंतर या कथेत रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. दोन पिढीतील लोकांच्या मनोवृत्तीतील फरक तसेच आचार- विचारांतील अंतर दाखवून लेखकाने एक वेगळेच भावविश्‍व येथे साकार केले आहे.

'भेट' या कथेतील रवी हा उच्चशिक्षित आहे. त्याला पसंत असणाऱ्या मुलीशी (लीला) लग्न करता येत नाही. जगाने जात-पात, गरीब- श्रीमंत अशा भेदापायी रवी व लीलाच्या सुखी जीवनाचे स्वप्न जबरदस्त प्रहराने भंगून टाकले होते. म्हणून अशा जगाला का भ्यायचे असे रवीला वाटते. रवीकडे अमाप पैसा आहे. त्याने तीन लग्ने केली पण ती असफल झाली. पैसा देऊन कोणतेही सुख घेता येते असे रवीला वाटते. लीला व रवी यांचे एकमेकांवर सात्त्विक प्रेम होते. २५ वर्षांपूर्वी त्या दोघांनी ठरविले होते की, जगाच्या पाठीवर आपण कोठेही असलो तरी २५ वर्षांनंतर नंतर आपण महाबळेश्‍वरला तळ्याजवळ भेटायचे. तो क्षण त्यांच्या जीवनात आला. ६ जानेवारी १९८९ ला ते सहा वाजता ठरविलेल्या ठिकाणी भेटतात. त्यावेळी लीला रवीला आवडणारे सर्व पदार्थ घेऊन येते. एकमेकांबद्दल विचारणा करतात. लीला घर संसारात सुखी असल्याचे सांगते. नवरा शांत वृत्तीचा आहे. दोन मुलगे आहेत. त्यातला एक बी. ई. करतो व दुसरा मेडिकलला आहे. हे ऐकून रवीला बरे वाटते. रवीने लीलासाठी आणलेल्या भेट वस्तू तिला देतो. नंतर रवीला 'दि हॉक डिटेक्टिव्ह एजन्सी'चा रिपोर्ट मिळतो. त्यात लीलाची खरी माहिती मिळते. लीलाने तिचे दु:ख सफाईदारपणे लपविले होते.

दारुड्या नवऱ्याने तिचा शारीरिक, मानसिक छळ केला होता. दारूच्या नशेसाठी सर्व इस्टेट उधळली होती. त्यानंतर लीलाने मोठ्या शर्थीने संसार सावरला होता. एकुलत्या एक मुलीचे लग्न लावून दिले होते.

रवीला लीलाच्या जीवनातील दु:ख अस्वस्थ करीत होते. रवीला सतत वाटत होते की, आपण लीलाची पुन्हा भेट घेऊन नवीन आयुष्याची सुरुवात करू शकतो. हे तिला समजावून सांगू असे त्याला वाटते. परिस्थितीमुळे रवी व लीलाचे लग्न होत नाही. पण २५ वर्षांनंतर ही त्याच्या ठिकाणी असणारे सात्त्विक प्रेम येथे दिसते. रवी लीलाचा स्वीकार करायला तयार आहे. यावरून रवी हा आधुनिक विचारसरणीचा आहे हे लक्षात येते. पैसा देऊन आपण सर्वच सुख विकत घेऊ शकत नाही. रवीकडे अमाप पैसा आहे पण सुख नाही. ह्याचे चित्रण या कथेत केले आहे.

'रक्त' या कथेत सांस्कृतिक फरक दाखविला आहे. या कथेतील ए. बी. मेनन हा भारतीय आहे. अमेरिकन रोझीशी तो लग्न करतो. रोझीची संस्कृती वेगळी आहे. रोझी एका स्टोअरमध्ये काम करते. मेनन तिच्या हसण्यावर, बोलण्यावर, आकर्षक पोशाखावर, कार्यक्षमतेवर, धीटपणावर व निर्भयतेवर भाळला होता. रोझी स्वतंत्र वृत्तीची आहे. ती अमेरिकन नागरिकत्व सोडायला तयार नव्हती. ए. बी. मेननचा काळा रंग जरी खपवून घेतला असला तरी अपत्य संभवाच्या बाबतीत अतिशय काळजी घेत होती. ती मैत्रिणीला म्हणते, "नो मोअर ब्लॅकीज ऑर ब्राऊनीज इन दि फॅमिली." [७] यावरून लक्षात येते की, रोझीला मेननचा बडा पगार हवा होता. मेनन नको. रोझीने

तडजोड केली होती. मेनन भारतात जात नाही. स्वत:च्या बहिणीच्या लग्नाला तो आर्थिक मदत करतो; पण लग्नाला जात नाही. रोझीला मेनन समजावून घेतो. पण रोझी त्याला समजावून घेत नाही. ती तिच्याच विश्वात असते. रोझीचे चर्च कधी चुकत नाही. मेननही तिच्याबरोबर चर्चला जातो. मेननचे सण ती कधी करत नाही. त्याच्या आवडी-निवडी जपत नाही.

मेननच्या वडलांचे पत्र आल्यावर रोझी मेननला पत्र आल्याचे सांगत नाही. मेननच्या भाषेचा उल्लेख 'जॅबरिंग इन मंकी डायलेक्ट' असा करते. मेननचे आई-वडील अमेरिकेत येणार हे समजल्यावर ती काही बोलत नाही. मेनन कामानिमित्त न्यूयॉर्कला जातो. त्यावेळी रोझी घर सोडून जाते. त्या दोघांच्यामध्ये फक्त व्यवहार असतो.

मेननचा मित्र कनूनायर याचा विवाह भारतीय मुलीशी झाला आहे. त्यांच्यात एकमेकाला समजावून घेऊन वैवाहिक जीवन सुरळीत चाललेले पाहून मेननला वाईट वाटते. या कथेतून हे लक्षात येते की, परदेशातील स्त्रिया भारतीय पुरुषांना समजावून घेतीलच असे नाही. त्या स्वतंत्र वृत्तीच्या असल्यामुळे त्या कोणाचाही विचार करत नाहीत. त्यांना फक्त व्यवहार माहीत असतो. येथे सांस्कृतिक अंतर दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय स्त्री व परदेशातील स्वतंत्रवृत्तीची स्त्री यांच्यातील फरक दाखविला आहे.

'पेगी' या कथेतील देवदत्त प्रधान अमेरिका युनिव्हर्सिटीत इंजिनिअरिंग करण्यासाठी जातो. त्यावेळी देवदत्तला पेगी भेटते. पेगीची गाडी खराब होते. देवदत्त तिला गाडी दुरुस्त करून देतो. पेगी देवदत्तला युनिव्हर्सिटीत पोहचवते. हळूहळू पेगीची व देवदत्तची ओळख वाढत

जाते. पेगी एक दिवस युनिव्हर्सिटीत उदास बसली होती. देवदत्त तिची आपुलकीने चौकशी करतो. त्यावेळी पेगी सांगते की, तिचा बॉयफ्रेंड कॉलीन याचा पेगीशी वाद झाला आहे. त्या भांडणात पेगीने कॉलीनला घराच्या बाहेर धक्के मारून काढले आहे. या घटनेनंतर देवदत्त तिला समजावतो. त्याच रात्री रागाने झोपेच्या गोळ्या घेते. गोळ्याच्या तंद्रीतच देवदत्तला फोन लावते. फोनवर काहीच बोलत नाही. देवदत्तला लक्षात येते की, हा फोन पेगीचा आहे. तो पोलिसांना फोन लावून माहिती देतो. त्यावेळी पेगी मोठ्या शर्थीने वाचते. पेगी या प्रसंगातून देवदत्तमुळे सावरते. पेगीला आई-वडील आहेत. आईने दुसरे लग्न केल्यामुळे तिला सावत्र बापाकडे राहवे लागते. पेगीला तिच्या वडलांसारखे मोठे वकिल व्हायचे आहे. पेगीला न्यूयॉर्कला जॉब मिळतो. ती न्यूयॉर्कला जाणार हे समजताच देवदत्त अस्वस्थ होतो. त्याला माहीत होते की, या देशातली पेगी आपल्याला परवडणार नाही. "काही वस्त्रे अशी असतात की, आपण कल्पनेने त्यांचे स्पर्शसुख घ्यायचे"¸ हे देवदत्तच्या लक्षात येते. पेगी गेल्यावर शरीराचा एक भाग तुटल्यासारखे देवदत्तला वाटते. 'पेगी इज नॉट माय कप ऑफ टी' असा देवदत्त विचार करतो. आपण भारतात जाऊ, आपण आपली लक्ष्मणरेषा ओळखायला पाहिजे. आपल्या देशातली, आपल्या संस्कृतीची सहचारिणी पत्करू आणि परत येथे येऊ असे देवदत्तला वाटते.

या कथेतील देवदत्त वास्तव जीवन जगणारा आहे. प्रत्येकाने आपली लक्ष्मणरेषा ओळखली पाहिजे, असे या कथेतून अनंत मनोहरांना सांगायचे आहे.

'एका प्रशिक्षणाची कहाणी' या कथेतील रशीद इंजिनिअर आहे. पवईला कॉलेज करत असताना कीर्तिचंद्र झा ह्या मंत्र्याचे भाषण ऐकले होते. त्या भाषणावरून प्रेरित होऊन आपणही एम. टेक. होण्यापेक्षा आय. ए. एस. व्हावे असे रशीदला वाटते. आय. ए. एस. झाल्यावर त्याला कडू अनुभव येतो. रशीदची नियुक्ती धनबादला होते. धनबादला गेल्यावर रशीद ऑफिसमध्ये नियमावली तयार करतो. त्यावेळी त्या नियमावलीला 'नव्या चंगीजखानाचा फतवा' असे शीर्षक देण्यात येते. रशीदने कर्मचाऱ्यांना कर्तृत्वनिष्ठतेचे प्रशिक्षण देण्याचा चंग बांधला होता आणि ते क्रोणालाही परवडणारे नव्हते. एन. आर. उर्फ नलिनीरंजन झा हे बडे प्रस्थ होते. धनबादला बांधकाम व्यवसायाचे मोठे नामांकित आहेत. त्यांनी बरीच संपत्ती गोळा केली होती. त्यांचे चिरंजीव आर. आर.ऊर्फ राधारमण झा राजकारणात होते. पैशाचे पाठबळ असल्यामुळे आर. आर. ना धनबादमध्ये कोणीच विरोध करू शकत नव्हते. त्यामुळे मोक्याच्या जागा हेरून त्या जागांसाठी वाट्टेल तितके पैसे मोजण्याची त्यांची तयारी असे. काही वेळा गुंडगिरी करून जागा मिळवत असत. जागेसंबंधी आर. आर. रशीदला भेटायला येतात. आर. आर. ला जागेची परवानगी पाहिजे होती, तर रशीद त्याला विरोध करतो तर आर. आर. रशीदला सही करावी म्हणून पैसे देतो; पण रशीद आर. आर.लाच अटक करवतो. आर. आर. परत जेलमधून सुटून येतो. रशीदला येताना पेढे घेऊन येतो. त्यावेळी रक्कम वीसऐवजी चाळीस घ्या पण सही करा असे रशीदला सांगतो. रशीद सही करायला नाही म्हणतो. आर. आर. रशीदला म्हणतो, ''साहेब सही करा, पैसे घ्या नाहीतर थोड्या

वेळाने आमच्या बॅरिस्टरांनी तुम्हांला दिलेली नोटीस वाचा. खोटा खटला भरून तुम्ही माझी अब्रुनुकसानी केल्याबद्दल साहेब, एकतर ही नोटीस घ्या किंवा सही तरी करा.'' असा रशीदवर दबाव आणतो.

रशीद सहीही करत नाही व पैसे घेत नाही. त्यापेक्षा नोकरी सोडतो. या कथेतून समाजवास्तव रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. भ्रष्टाचार कसा बोकाळतो याचे उत्तम उदाहरण अनंत मनोहरांनी दिलं आहे. राजकारणी, लबाड लोकांपासून दूर राहण्यात शहाणपणा असतो हे दाखवून दिले आहे. आर. आर. रशीदला म्हणतो, ''हे तुमचं एक प्रकारचं प्रशिक्षणचं म्हणा ना....'' यावरून हे लक्षात येते की, भ्रष्टाचारी लोक स्वत: भ्रष्टाचार करतात आणि दुसऱ्याला भ्रष्ट बनवतात. काही वेळा लाच देऊन तर काही वेळा दबाव आणून. ही सत्यपरिस्थिती चित्रित केली आहे.

'मुकूट' या कथेत राजकारणी लोकांचे चित्रण आले आहे. या कथेतील बाजीराव पाटील वडगावकर हे सी. एम. होण्याचे स्वप्न पाहतात. पण त्यांचा अपेक्षाभंग होतो. बाजीरावांनी बाविसाव्या वर्षी चळवळीत पाऊल टाकले ते मागे घेतलेच नाही. बेचाळीसच्या आंदोलनात ते सहभागी होते. जनतेची सेवा करायची हे त्यांचे ध्येय असले तरी त्यांचा मार्ग मुकुटातून जातो. यासाठी असंतुष्ट कार्यकर्त्यांसमोर एखादा तुकडा फेकण्याचे हातात बळ असायला पाहिजे. विरोधकांना जागच्या जागी ठेवण्यासाठी आपल्या ताब्यात त्यांच्या वैयक्तिक फाइल्स हव्यात हे त्यांच्या लक्षात आले होते. बाजीराव सी. एम. होत नाहीत. बाजीरावांना वजाबाकीचे राजकारण करायचे नव्हते.

त्यासाठी डोके शांत ठेवले पाहिजे हे त्यांना समजले होते. या राजकारणामुळे घराकडे दुर्लक्ष झाले आहे. घरात भाऊबंदकी शिरली आहे. श्रीपती व मोहन या मुलांना ते वाटण्या करून देतात. बाजीरावांना प्रतिस्पर्धी आपल्यापेक्षा उंच होऊ द्यायचा नव्हता. त्यांची आकाशात झेप घ्यायची संधी हुकली होती. तालुक्याचे राजकारण म्हणजे डबक्यात पोहणे. जिल्हा परिषद नदीसारखे. राज्य मंत्रिमंडळ म्हणजे समुद्र आणि केंद्र सरकार म्हणजे प्रचंड महासागर असे बाजीरावांचे मत होते. त्यांना तालुक्याचे राजकारण अगदी क्षुद्र वाटत होते. बाजीराव आजपर्यंतच्या घडलेल्या घडामोडींचा विचार करत असतानाच फोन येतो. बाजीरावांना सहकार खात्याचे उपमंत्री म्हणून नेमले गेल्याची बातमी मिळते. त्यावेळी त्यांचे शरीर त्यांना हलके वाटू लागते. डोक्यावरचा सत्तेचा मुकूट जड वाटू लागतो. अशी त्यांची मनस्थिती चित्रित केली आहे.

या कथेतील बाजीरावांना सत्ता, पैसा या दोन्ही गोष्टींत आपल्या पेक्षा वरचढ कोणी असू नये असे वाटते. राजकारणी लोकांचे एकमेकांबद्दल हेवेदावे, कुरघोडी येथे दाखविल्या आहेत. या कथेतून मानवी प्रवृत्तीचे दर्शन घडविले आहे.

'मनोमनीची अबोल वेडी' या कथेतील दमयंती विजयवर प्रेम करते. पण त्याला कधी सांगत नाही. दमयंती खानोलकर ही चार वर्षाची असल्यापासून विजयबरोबर खेळते, बागडते. मोठे झाल्यावरही त्या दोघांमध्ये मैत्रीचे वातावरण असते. दमयंतीने दहावीला मार्क्स चांगले पडल्यावर तिने सायन्सला ॲडमिशन घ्यावे , असे विजय सांगतो. पण दमयंतीला चित्रकलेची आवड आहे म्हणून ती जे. जे. ला ॲडमिशन

घेते. विजय पवईला इंजिनिअरिंग पूर्ण करतो. पुढच्या शिक्षणासाठी तो अमेरिकेत जातो. विजय अमेरिकेत जाण्या अगोदर दमयंतीचे वडील वारतात. घराची जबाबदारी दमयंतीवर येते म्हणून ती शिक्षण सोडून नोकरी करते. दोन बहिणींची लग्ने लावून देते. भावाचे शिक्षण पूर्ण करण्याचा प्रयत्न करते. विजयबद्दल दमयंतीला प्रेम, आपुलकी वाटते ; म्हणून विजयला आवडणारे सर्व पदार्थ करून घालते. विजय अमेरिकेला जाताना एक स्केचबुक देते. दमयंतीने काढलेली रेखाचित्रे असतात. तिकडे कंटाळा आल्यावर ती स्केच बघ म्हणून आवर्जून सांगते.

विजयला एम. टेक. पूर्ण झाल्यावर प्राध्यापकांनी पीएच. डी. साठी ऑफर केली होती. एम. टेक. पूर्ण केल्यावर तो पीएच. डी.चे काम चालू करतो. पण नकळत तो अस्वस्थ होतो. अमेरिका स्वतंत्र देश आहे. येथील स्त्री पुरुषाएवढीच स्वतंत्र आहे. परदेशातील मोकळेपणाचे वागणे, बोलणे, फिरणे, बॉयफ्रेंड्स्, गर्लफ्रेंड्स् पिकनिकला जोडीजोडीने जाणे, डेटिंग यामुळे विजय अवस्थ होतो. विजयला अचानक दमयंतीच्या स्केचबुकची आठवण होते. आकाशात वीज चमकावी तसा तो एक एक चित्र पाहू लागला. ''फुलं तोडणारा मुलगा, कुंपणापलीकडे उभी असलेली गोबऱ्या गालाची मुलगी. झोपलेला तोच मुलगा. तोंडात दोन बोटे घातलेली खाली वाकून त्या मुलाकडे पाहणारी तीच सावळी मुलगी.'' [१] ही सर्व चित्रे दमयंतीने तिच्या व विजयच्या पहिल्या भेटीपासून रेखाटली होती. या चित्रांतला मुलगा हा विजय तर गोबऱ्या गालाची मुलगी म्हणजे दमयंती हे त्याच्या लक्षात येते. दमयंतीची पत्रे काढून वाचतो. त्यात दमयंतीने विजयला दिलेल्या

सूचना ,त्याची घेतलेली काळजी यावरून विजयच्या लक्षात येते की, दमयंतीचे किती प्रेम आहे.

तो अंतर्बाह्य थरारतो. त्याच्या लक्षात येते, दमयंतीने आपल्याला किती व्यापून टाकले आहे. म्हणूनच आजपर्यंत दुसऱ्या स्त्रीचा विचार येऊ शकला नसेल. विजय दमयंतीला फोन लावतो आणि लग्नासाठी मागणी घालतो. क्षणात 'हो' उत्तर येते. सहवासाने प्रेम वाढते हे या कथेतून दिसून येते. मनोमन विजयवर प्रेम करणारी दमयंती या कथेत भेटते.

'रात्रंदिवस आम्हा' या कथेतील मंगल छोटाणी याचे 'अपना फूट वेअर' हे दुकान आहे. पावसाळी अधिवेशनात गदारोळ उठतो. कमर्शियल टॅक्स कलेक्टर श्री. नंबियार यांनी तीन महिन्यांत प्रत्येकाने किमान पक्षी पंचवीस पंचवीस केसेस सहज तयार कराव्यात असा दम देतात. त्यावर कार्यवाही केली जाते. कमर्शिअल टॅक्स कलेक्टरनं हवा तंग केली होती. याची खबर 'अपना फूट वेअर' च्या मंगलभाई छोटाणीला लागली नव्हती. मंगलभाईने नवीन माल भरला होता. दुकानातून मालाची विक्री भरपूर होत होती. कॅशबॉक्स गच्च भरत होते. मंगलने काही सेल्स टॅक्सची महत्त्वाची कागदपत्रे दुकानात खालच्या खणात गळ्याला तात लागेल असे कुलूप घालून ठेवली होती. पण त्या कागदपत्राकडे पाहयला मंगलला वेळ नव्हता. एक दिवस सी. टी. ओ. ची दोन माणसे दुकानात येतात व मंगलची चौकशी करतात. त्याच्या कागदपत्रांची चौकशी करतात. पण दुकानातील कामगार शबीर काहीच सांगत नाही. शबीर मंगलच्या घरी फोन करून सी. टी. ओ. ची माणसे आलीत हे सांगतो. त्यावेळी मंगल सेल्स टॅक्स कन्सल्टंटला

फोन लावतो. पण कन्सल्टंट पारेख यांची भेट होत नाही. म्हणून कन्सल्टंट खोब्रागडेला फोन लावतात. शेवटी पारेख हे एक्स्पर्ट असल्यामुळे ते त्यांची केस मिटवितात. मंगलला थोडा दंड भरावा लागतो. मंगल पारेखला केस मिटल्याबद्दल प्रेमोपहार देतो.

दुसरीकडे सी. टी. ओ. च्या माणसांनी केसेस करण्याचे फारच मनावर घेतले. रिटेल दुकानदारांवरदेखील त्यांनी धाडी घातल्या. कोणालाही सोडले नाही. रोजची शंभर रुपये विक्री असणाऱ्यांनाही त्यांनी तंग केले. तीन महिन्यांत सेल्स टॅक्सच्या राज्यभरात खूप केसेस झाल्या. अधिवेशनात प्रश्नोत्तराच्या तासाला गृहमंत्र्यांनी सभागृहाला सी. ओ. टी. ची आकडेवारी सांगितली व सत्ताधारी पक्षाची बाजू सावरली. मुख्यमंत्र्यांनी सेल्सटॅक्स कमिशनर आणि त्यांचे खाते यांचे रात्रंदिवस काम केल्याबद्दल कौतुक केले.

या कथेत वास्तवता दिसते. सेल्स टॅक्स चुकविणाऱ्या छोटाणीची धडपड दिसते. छोटाणीसारख्या फसव्या माणसांना सोडून जे शंभर रुपये मिळवितात अशा गरीब दुकानदारांना त्रास देणारे सी. ओ. टी. चे लोक या कथेत भेटतात. आपल्या पक्षाची बाजू सावरणारे मंत्रीही या कथेत भेटतात.

'जर्म' या कथेतील सत्यव्रत साठे हा नवबौद्ध आहे. सत्यव्रत लॉ करतो. सत्यव्रत सडेतोड वृत्तीचा आहे. सत्यव्रताला जे जे प्रस्थापित आहे त्याचा राग येतो. सत्यव्रताला समाज वास्तवाची जाण आहे. म्हणून तो लेखकांना बोलतो. लेखक स्वत:ची प्रौढी मिरवतात आणि समाज वास्तवाकडे दुर्लक्ष करतात. अशा लेखकांचे लेखन जाळून टाकले

पाहिजे. त्यांचे लेखन कवडीमोल आहे. सत्यव्रत व अप्पासाहेब पेंडसेंची ओळख होते. अप्पासाहेब पेंडसे हे नाशिकचे प्रसिद्ध लेखक होते. त्यांच्या नावावर विपुल लेखन होते ; पण ते समाजातील वास्तव जीवन रेखाटणारे नव्हते याचा सत्यव्रताला राग येई. सत्यव्रताच्या लेखनाला राज्य पुरस्कार मिळतो म्हणून गावकरी त्याचा सत्कार घ्यायचे ठरवितात. पण अध्यक्ष कोण ? हा प्रश्न उभा राहतो. अप्पासाहेबांना अध्यक्षपद भूषविण्यास बोलविले जाते.

सत्यव्रतासारखा समाजाकडे चौकस बुद्धीने बघणारा तरुण या कथेत भेटतो. लेखकांना समाज वास्तव दिसत नाही का ? गावकुसा बाहेरील लोकांच्यावर अन्याय होताना हे लेखक संमेलनाचे कौतुक करतात. दलितांच्या झोपड्या पेटवून दिल्या जातात. दलितांच्या फाटक्या संसारांचे कोळसे केले जाते. दलित स्त्रीला विवस्त्र करून तिची धिंड काढली जाते. घोटभर पाण्यासाठी दलित वस्तीला वाळीत टाकले जाते, असे करत असताना प्रतिष्ठित लोकांची अप्रतिष्ठा होत नाही का ? असा सवाल सत्यव्रत विचारतो.

अप्पासाहेबांना अध्यक्षपद घेण्यासाठी आमंत्रित केले जाते. त्या रात्री अप्पासाहेबांच्या डोक्यात जर्म येतो. "उद्या अध्यक्षपद भूषविताना एका लेखकाचे वस्त्रहरण होणार. " हे त्यांच्या लक्षात येते. अप्पासाहेब भाषणात सत्यव्रतालाच सूचना देतात. "तुम्ही सभा, संमेलन टाळायला पाहिजे नाहीतर तुम्हीही दलितांमधील ब्राह्मण होऊन जाल. तुम्ही नवीन लेखक आहात.तुमचा मनातल्या प्रक्षोभाचा लाव्हा लेखनातून बाहेर येऊ द्या. तुमचं मन रसरशीत आहे. संवेदनाक्षम आहे. आमची मनं निबर

झाली आहेत. वृत्ती थंड झाल्या आहेत. रक्त थंड पडलं आहे. त्यामुळे आम्हांला नवे विषय दिसत नाहीत. भावत नाहीत. फार तर वरवरचे चित्रण आम्ही करू. तसं तुमचं नाही.'' [१०] असे म्हणून अप्पासाहेब आपली बाजू सावरून धरतात.

या कथेतून समाजातील वास्तवता लक्षात येते. लेखकांचे लेखन समाजाला धरूनच असायला पाहिजे असा अट्टाहास करणारा सत्यव्रत या कथेत भेटतो. समाजवास्तव मांडण्याचा प्रयत्न सत्यव्रत करतो.

'सूर्यमुखी' या कथेतील वेंकी हा इंजिनिअर आहे. या कथेत भारतीय व अमेरिकन संस्कृतीचे दर्शन होते. दोन भिन्न सांस्कृतिक फरक येथे दिसून येतो. वेंकीला परदेशातील स्त्रियांचा स्वतंत्र स्वभाव आवडत नव्हता. बाहेर कोठे कोक घेतला तर त्या कोकचे पैसे आपले आपण द्यायचे म्हणजे दुसऱ्याकडून कधीच पैसे घ्यायचे नाही ही वृत्ती त्याला खटकते. भारतात वेंकीचे आई-वडील त्याच्यासाठी मुली शोधत आहेत. वेंकीला ग्रीनकार्ड मिळाल्याशिवाय तो जाणार नव्हता. वेंकीला परदेशात गेल्यावर मार्जी व के या दोन स्त्रिया भेटतात. त्यांच्याशी मैत्री होते. पण त्यांचा स्वभाव, अधिक सैलपणा हा वेंकीला आवडत नाही. वेंकीला त्याच्या मित्राचे बंगलोरहून पत्र येते. त्या पत्रात द्राक्षायणीचा उल्लेख सापडतो. ही द्राक्षायणी वेंकीच्या गावच्या सावकाराची मुलगी आहे. ही द्राक्षायणी वेंकीच्या मित्राच्या कंपनीत नोकरीला आहे. ती वेंकीवर प्रेम करते. हे ऐकल्यावर सर्वांगावरून मोरपीस फिरल्यासारखं वेंकीला वाटते. वेंकीला त्यावेळी अमेरिकेतील नवीन नोकरीचा विसर पडला आणि तो सावळ्या कमलिनीच्या प्रेमात पडला.

या कथेतून वेंकीवर मनापासून प्रेम करणारी द्राक्षायणी भेटते. प्रेमासारख्या नाजूक विषयावर लेखन करताना अनंत मनोहर यांच्या कथेत मादकता येत नाही; तर सात्त्विक प्रेमाचा प्रत्यय येतो. दोन देशांतील सांस्कृतिक फरक या कथेत दाखविला आहे.

'आदिम' या कथेतील पेनी हा गुन्हेगारी वृत्तीचा आहे. पेनीचे संबंध वाईट लोकांशी होते. त्यात जॉन हॅरिसन हे न्यूयॉर्क शहरातील काळ्या गुन्ह्यातील प्रसिद्ध नाव होते. पॉल हा पेनीचा मित्र होता. पॉलने पेनीला टोळीत निवडून घेतले होते. पॉलचा पेनीवर विश्वास होता. पेनीने कोरियन गुरूकडून मानवी देहातील नसनस माहीत करून घेतली होती. कोणती नस ओढल्यावर माणूस थंड होतो. कोणती नस दाबून माणसाला बेशुद्धी आणता येते. आवळलेली मूठ कशी उघडता येते. याचे पेनीने शिक्षण घेतले होते. कोरियन लोक शत्रूला शारीरिक व मानसिक छळ करून कसे बोलते करतात याचे ज्ञान पेनीला त्याच्या गुरूने दिले होते. पेनी व पॉल यांनी मॉर्गन बँक लुटण्याची पूर्ण तयारी केली होती; पण जॉन हॅरिसनने रखवालदाराला सावध केले होते. त्या दरोड्यात बँकेचा रखवालदार प्राणांतिक जखमी झाला होता. जॉन हॅरिसनमुळे पेनीला तुरुंगात जावे लागले. जॉनने पेनीच्या बहिणीला मार्थाला त्रास देण्यास सुरुवात केली होती. मार्थाही शांत स्वभावाची होती. भावाने (पेनी) चोरीचा माल कुठे ठेवला हे तिला माहीत नव्हते ; तरीही जॉन तिला त्रास देतो. पेनी तुरुंगातून सुटून आल्यावर जॉनचा शोध घेतो. जॉनला शिक्षा देताना पेनीने शिकलेल्या तंत्राचा वापर तो

करतो. जॉनला तो एकदम मारत नाही ; तर जॉनच्या डाव्या पायाला जखम झाली होती. त्या जखमेवर दारूची बाटली ओततो. जेणे करून मुंग्यांना त्यास वास लागेल आणि जॉन त्याच्याच डोळ्यांनी मरण पाहील आणि हाच न्याय आदिम अवस्थेतला असेल. पेनी सिगार पितो आणि जॉनच्या मांडीवर चुरगाळून विझवतो. पेनी त्या जखमेवरही दारू शिंपडतो आणि म्हणतो, '' जॉन हॅरिसन, त्या दोन मुंग्या पहा. त्या लवकरच तुझ्या जवळ येतील, वास घेतील आणि आपले अन्न सापडल्याची बातमी इतर मुंग्यांना देतील. मग प्रभू येशूही मृत्यूपासून तुझी सुटका करू शकणार नाही. तुझ्या मृत्यूचे ते अग्रदूत पाहून ठेव.''[११] जशास तसे वागणारा पेनी या कथेत भेटतो. त्याचा न्याय हा आदिम आहे.

'डेड एन्ड' या कथेत विभक्त कुटुंबपद्धतीचे वर्णन आले आहे. या कथेतील जॅक हा एक क्रिकेटर आहे. त्याच्याजवळ सर्व काही आहे. पण आत्मविश्वास नव्हता. त्याच्या जीवनात आलेली मिली हिने जॅकला आत्मविश्वास करून दिला. जॅकला खेळात प्रोत्साहन दिले. जसे जॅकला यश मिळत गेले तसा तो गैरमर्जीप्रमाणे वागू लागला. मिली बाहेरगावी गेल्यावर दुसऱ्या मुलगीला जॅक घेऊन येतो. मिली अचानक घरी येते त्यावेळी ती भडकते व जॅकला सोडून जाते. त्यावेळी जॅकची मनस्थिती स्थिर राहत नाही. क्रिकेटवर त्याचे लक्ष लागत नाही. कधी शून्यावरच आऊट होतो. अगदी टिममध्ये त्याला ठेवू नये असे सगळी टीम म्हणते. त्याचवेळी त्याच्या जीवनात लॉरिसा येते. लॉरिसा त्याला प्रोत्साहन देते. शेवटी तो मॅच जिंकतो. त्याला खरी गरज होती ती

आत्मविश्वास, सहानुभूतीची, मानसिक आधाराची. ती त्याला लॉरिसाकडून मिळते.

या कथेत जॅकची मानसिक स्थिती दाखविली आहे.

'झोका' ही वास्तवता चित्रण करणारी कथा आहे. यात शिक्षणातील फोलपणा या कथेत अनंत मनोहरांनी चित्रित केला आहे. या कथेतील डॉ. पाध्ये पॅथॉलॉजी डिपार्टमेंटमध्ये एच. ओ. डी. आहेत. धुळ्यात शिक्षण घेतल्यामुळे डॉक्टरांना धुळ्याचे विशेष आकर्षण आहे. तिथल्या आठवणी त्यांना येतात. डॉ. पाध्येंना धुळ्यातच व्हायवा घेण्यासाठी बोलविले जाते. डॉ. पाध्येंना भूतकाळातील सर्व घटना आठवतात. डॉ. पाध्येंबरोबर शिकायला असणारी अंबर व लीना याच्या आठवणी त्याच्या मनाच्या कोपऱ्यात दडल्या होत्या. त्या वर आल्या होत्या. अंबर व लीना आता बाहेर देशात आहेत असे त्यांना वाटते. पण अचानकच अंबरचा फोन येतो. अंबर व लीना भारतात आले आहेत, त्यांचा मुलगा धुळ्यात मेडिकलला आहे आणि त्याचा व्हायवा पाध्ये घेणार आहे हे ऐकताच पाध्येच्या लक्षात आले. अंबर व लीनाच्या मुलाला व्हायवामध्ये पास करण्यासाठी अंबरने फोन केला होता. अंबर व लीनाच्या आग्रहाखातर अंबर व लीनाचा मुलगा हेमचंद्राला ५५ मार्क्स दिले गेले. वास्तविक हेमचंद्र हा फार हुशार नव्हता; पण अशा मुलांमुळे हुशार मुलांचे हाल होतात. या मुलांना जागा मिळतातच कशा हा डॉ. पाध्येंना प्रश्न पडतो.

या कथेतून शिक्षणातील भ्रष्टाचार दाखविला आहे. मुलाची पात्रता नसताना मार्क्स देऊन डिग्री मिळविण्याचा प्रयत्न करणारे अंबर व लीना

भेटतात तर मैत्रीसाठी अंबर व लीनाच्या मुलाला (हेमचंद्र) मार्क्स वाढवून देणारे डॉ. पाध्ये या कथेत भेटतात.

'स्ट्रॅटेजी' या कथेतील अंजली हुशार आहे. तिच्या आई-वडलांची इच्छा होती की, अंजूला डॉक्टर किंवा इंजिनिअर बनवायचे. पण अंजू मर्जीने जे. जे. आर्ट्सला ॲडमिशन घेते. अंजलीचे वडील वकिल आहेत. ती वडलांसारखीच बोलकी होती. अंजलीची आई व अंजूचे कधीच पटत नव्हते. वडलांना ती सर्व गोष्टी सांगते. अंजूच्या बाबांना तिच्या बाबतीत काळजी वाटते. तिच्या मनात काय आहे हे जाणून घेण्याचा ते प्रयत्न करतात. त्यावेळी सुमेधचे नाव अंजलीच्या तोंडात सारखे असते हे दिसते. हा सुमेध कोण, कुठला त्याची चौकशी बाबा करतात. सुमेध मध्यमवर्गी कुटुंबातला आहे. तो आर्किटेक्ट आहे. अंजलीला तो आवडतो. दोघेही एकमेकांवर प्रेम करतात. अंजलीला रसिक नावाच्या मुलाचे स्थळ सांगून येते तरी ती त्या स्थळाला नकार देते. रसिक इंजिनिअर आहे. त्याच्या वडलांचा लॉजिंगचा व्यवसाय आहे. त्याच्या श्रीमंतीला महत्त्व न देता सुमेधला ती होकार देते. सुमेध साध्या घरातील असला तरी त्याच्याबरोबर संसार करायला तयार होते. जेव्हा बाबा तिला विचारतात, "तुला सर्व सुविधांची सवय आहे. त्या घरात तुला चैन पडेल का ?" त्यावर अंजली म्हणते, "पण बाबा त्यात सुद्धा एक गंमत नाही का ! भरलेल्या घरात तुम्ही मला दिले तर तिथं हौसेनं काय आणणार ? आणि त्याला कितीशी किंमत ?........." [१२] या विधानावरून अंजलीचा समजूतदारपणा लक्षात येतो.

श्रीमंतीपेक्षा प्रेमाला महत्त्व देणारी अंजू या कथेत भेटते.

'दृष्टव्य' या कथेत आलेला ओंकार हा आधुनिक विचारसरणीचा आहे. जुन्या रूढी, परंपरेला त्याचा विरोध आहे. गणेशवाडीचे संस्थान सांभाळणारे स्वामी बुवा, वेलणकरसर यांनी ओंकार हुशार आहे म्हणून त्याला आर्थिक मदत केली होती. ओंकार संस्कृत विषय घेऊन एम. ए. होतो. नंतर तो पीएच. डी. करतो. संस्कृत विषयावर प्रेम करणारा तरुण या कथेत भेटतो. त्याला रामानुजांचे व शंकराचार्यांचे तत्त्वज्ञान ज्ञात होते. गणेशवाडीचे स्वामी वृद्ध झाल्यामुळे त्यांना वाटते, 'आपण आता गादीचा मोह सोडला पाहिजे' ; पण या संस्थानाला चालविणारा मनुष्य त्यांना भेटला नव्हता. स्वामींच्या लक्षात ओंकारचे नाव येते. स्वामी गणेशवाडीच्या संस्थानाची गादी सांभाळण्यासाठी ओंकारला विनंती करतात. त्यावेळी ओंकार गोंधळतो. त्याला काय बोलावे सुचत नाही. शास्त्रीबुवा त्याला समजावतात. त्याची मानसिक तयारी करतात. तेव्हा ओंकार गणेशवाडीला रवाना होतो. संस्थान सांभाळणे ही सोपी गोष्ट नाही हे ओंकारच्या लक्षात येते. हे संस्थान सांभाळणे हे आपले काम नाही. ज्ञान ग्रहण करणे हाच मोठा आनंद आहे आणि तो आनंद त्याला संस्थानात मिळत नाही. त्याच्या समोर आयुष्य पडले होते. त्याची द्विधा मन:स्थितीचे चित्रण या कथेत रेखाटले आहे. ओंकारला गणेशवाडी संस्थानातील अज्ञान मान्य नव्हते. वाम मार्गाने पैसा मिळविणे आणि तो पैसा पचावा म्हणून त्यासाठी अपहार केला जातो. त्या धनातला काही भाग दान देणे आणि पापाचरणाकडे दुर्लक्ष करणे. हे त्याला मान्य

नाही. मठातील पोथिनिष्ठा, वामाचार, भोगासक्ती याला ओंकारचा विरोध होता. एका मध्यरात्री ओंकार विचार करतो. कोणी नाही याची चाहूल घेऊन तो शांतपणे अंधारात मिसळून जातो.

या कथेत पुराणातील दाखले दिले आहेत. मठातील अनाचार चित्रित केला आहे. स्वामींच्या सेवेसाठी निष्पाप मुलींना ठेवले जाते. हे ओंकारला आवडत नाही. देवाच्या नावाखाली मठातील लोक सामान्य लोकांना फसवितात आणि गरीब जनताही त्यात फसली जाते. याचे वर्णन या कथेत आले आहे. धनिकाला धर्मनिष्ठ ठरविले जाते. मठातील अनाचार या कथेत दाखविला आहे. यातील ओंकार हा सदसद्‌विवेक बुद्धीचा आहे हे दिसून येते.

## 'कर्कोटक' यातील अभिव्यक्ती सामर्थ्य

### १) भाषा शैली-

अनंत मनोहरांच्या कथांतील बहुतेक पात्रे ही उच्चशिक्षित आहेत. त्यामुळे बऱ्याच कथांतून इंग्रजी भाषेचा वापर केला आहे. त्यामुळे पात्रांमध्ये एकप्रकारचा जिवंतपणा येतो. खालील उदाहरणावरून याची कल्पना येईल. उदा- लाट.

''मिस्टर भार्गव, तुम्हांला काही विचारायचंय का ?''

हाताचा पंजा पालथा करून भार्गव म्हणाला होता,

''जस्ट ए कपल ऑफ क्वेश्चन्स मॅडम.....''

पर्सनेल ऑफिसरच्या भिवया ताणल्या गेल्या,

''फायर देम.''

"हो मच हाय कॉन आय गो ?" [१३]

काही वेळाला कथेत परिणामकारक शब्द वापरले आहेत.

"तिच्या मनावर कडवटपणाची चव पसरली." [१४]

"दमयंतीचा पांढरा फटक पडलेला चेहरा पाहून तो बेदम हसला." [१५]

कथेत ग्रामीण शब्दाचांही वापर केल्यामुळे भाषेला अधिकत्त्व देण्याचा प्रयत्न दिसतो. युनिव्हर्सिटीत गेल्यावर देवदत्त मनगटीचे छायाचित्रण घेत होता. त्याचे वर्णन करताना भाषाशैलीत ग्रामीण शब्दांचा वापर केला आहे.उदा. 'पेगी' या कथेतील वर्णन पाहा."नाकाड वर करून एक मगर प्रकाश पिऊन घेत होती." [१६] भाषेत प्रतिमांचा वापर केला आहे. उदा. 'एका प्रशिक्षणाची कहाणी' या कथेतील रशीदला राजकीय लोकांचा आलेला कडू अनुभव व्यक्त करताना वापरलेली भाषा यावरून लक्षात येते."आपल्या एवढा मोठं माणूस अशा डिपार्टमेंट मध्ये निदान त्याकाळी नसावा याबद्दल रशीदची आता पूर्ण खात्री झाली आहे. त्याचा कळसाध्याय म्हणता येईल असा एक प्रसंग तर रशीदच्या मनावर खडकातल्या लेण्याप्रमाणे अगदी कोरला गेला आहे." [१७]

'रात्रं-दिवस आम्हा' या कथेतील कमर्शियल टॅक्स कलेक्टर श्री. नंबियार यांचे वर्णन करताना वापरलेल्या भाषेत वाक्यप्रचारांचा वापर केला आहे."अति रागाने नंबियारांचा चेहरा जांभळा झाला होता." [१८]

'एका प्रशिक्षणाची कहाणी' या कथेत राजकीय लोकांचे चित्रण करताना आलेली भाषाशैली, "पण अत्तर संपले तरी बाटलीत त्याचा सुगंध रेंगाळतो तसे मंत्रिपद गेले तरी कीर्ती चंद्रांचे शब्द शिल्लक होते." [१९]

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

भाषेत आधुनिक प्रतिमाचा वापर केल्यामुळे भाषेला भारदस्तपणा प्राप्त करून दिला आहे. 'जर्म' या कथेतील उदाहरण पाहा. ''अप्पासाहेबांनी डोळे मिटले. विचारांचा अँन्टेना सरला होता. तो नीट लावून घेतला. बटण दाबले. मनाच्या पडद्यावर प्रथम एक ठिपका उमटला. बघत बघत ठिपक्यांनी स्क्रीन भरून गेला आणि पुढल्या क्षणी चित्र उमटू लागले.'' [२०] विचारांचा अँन्टेना, मनाचा पडदा, ठिपक्यांनी स्क्रीन भरणे अशा शब्दांमुळे भाषेला भारदस्तपणा आला आहे. 'मागून शब्द आले. भिजलेल्या रेशमासारखे ' [२१] ही प्रतिमा वापरली आहे.

'दृष्टव्य' या कथेतील ओंकारच्या तोंडची भाषा ही प्रतिमांतून अभिव्यक्त होताना दिसते. उदा.- ''का कोण जाणे मला ध्यानस्थ बसलेल्या पर्वतांपेक्षा आत्मतत्त्वात हिंदोळणारे सागर आणि मानवी जीवनाचा खळमळ होणाऱ्या या लोकमाता जास्त आवडतात. युगानुयुगे त्या वाहतच आहेत. लोकशुद्धीचे काम करताहेत......'' [२२]

दमयंतीचे स्केचबुक बघताना विजयची मनस्थितीचे वर्णन करताना आलेली भाषाशैली उदा- 'अचानक आकाशात वीज चमकावी तसं झालं.' [२३] भाषेत संस्कृत भाषेचा वापर केला आहे. संस्कृतातील दाखले , उदाहरणे देण्यात आली आहेत. 'दृष्टव्य' या कथेत संस्कृतातील माघ, कालिदास यांच्या कवितांचा वापर केला आहे.'दृष्टव्य' या कथेत ओंकारचे गुरू व ओंकार यांच्यातील संवाद हा संस्कृतातील साहित्यावरचा आहे. भाषेत एक प्रकारची लयबद्धता, काव्यात्मकता आल्याचे दिसून येते.

उदा. - 'ठाठं ठठठं ठठठं ठठंठ!'

ओंकार गोंधळतो.

"अरे, ही कडव्याची चौथी ओळ. पहिल्या तीन ओळी सांग, कर समस्यापूर्ती. नाही येत ? सोपं आहे.

रामाभिषेक जलमारहत्त्या हस्तच्युती हेम्नघटे युवत्या :
सोपान मार्गे करीतो शब्दं ठाठठठठं ठठठं ठठंठ !" २४

अशाप्रकारे दाखलेही दिले आहेत.

**१) वाक्यप्रचार**

१) चेहरा पांढरा पडणे.

२) चेहरा लांबुळका होणे.

३) आकाशात वीज चमकणे.

४) तांबरलेल्या डोळ्यांनी पाहणे.

५) खडाजंगी उडणे.

६) तुळी कोसळणे.

अशा वाक्यप्रचारांतून मानवी स्वभावाचे हावभाव, भावभावनांचे दर्शन होते.

२) म्हणीचा वापर केला आहे.

१) जिथे शितं असतात तिथे भूतं जमतात.

## २) निवेदन शैली-

कथेचे निवेदन किंवा कथन करणे वैशिष्ट्य आहे. निवेदन करताना निवेदक वाचकाला कथेतील व्यक्तिरेखांचा परिचय करून देतो. घटना प्रसंगावर भाष्य करतो. अनंत मनोहरांनी निवेदन करताना प्रथमपुरुषी, तृतीय पुरुषी अशा निवेदन पद्धतीचा वापर केला आहे.

निवेदन करत असताना काही कथांत ते अलिप्त राहून, तटस्थ राहून निवेदन करतात. उदा. - 'कर्कोटक' कथेतील निवेदन - "त्याची नजर पुन्हा कारपार्ककडे गेली. खालच्या मजल्यावरचे दोन विद्यार्थी त्यांच्या गाडीत सामान भरत होते आणि पलीकडच्या बिल्डिंगमधली एक मुलगी तब्येतीने गाडी पुसत होती. हवा थंड होती. सगळीकडे असलेल्या हिरवळीवरून येणारा वारा जास्त थंड वाटत होता. वर जाणाऱ्या रस्त्याच्या डाव्या हाताला असलेल्या नीडल पाईन वृक्षांच्या गर्दराईतून वाऱ्याची झुळूक सळसळत येत होती. 'अप' आणि 'डाऊन' दोन्ही रस्त्यांच्या तीन तीन 'लेन्स' मधून गाड्या पंचेचाळीस मैल वेगाने पळत होत्या. वाहतुकीला अडवणारे, मोकळीक करणारे इशारे देणारे लाल पिवळे हिरवे दिवे बिनभोबाट आपापले काम करीत होते." [२५] काही कथेत निवेदन करताना पात्रांचे मनोविश्लेषण, संज्ञा प्रवाह होताना दिसते. 'रक्त' या कथेतील मेननचे मनोविश्लेषण पाहता येईल. "आपलं जुन्या वळणाचं घर, धर्मनिष्ठ आई. जुळवून घेणारे ; परंतु मनाने जुन्या मतांचे असलेले वडील. आईची व्रते, उपासनापास सोवळ्याचा आग्रह. परान्न जवळपास वर्ज्य मानणारी आई. यात रोझी कुठं बसते ? आपण मद्रासला गिंडीच्या इंजिनिअरिंग कॉलेजला जायला निघालो तर आई धास्तावलेली होती. प्रत्येक सुटीत ती आपल्यात काही बदल झालाय का बारकाईने पाहत होती. पुढे आपण परदेशात जायला निघालो, तेव्हा तर त्या कल्पनेने पुरती हादरून गेली होती. आता तिचे काय झाले असेल कोण जाणे ? अप्पांच्या पत्रात आईबद्दलचे उल्लेख अतिशय त्रोटक असतात....." [२६] निवेदन करताना वातावरण निर्मिती, प्रसंगाचे चित्रण करून निवेदन

परिणामकारक केले आहे. 'पेगी' कथेतील उदाहरण पाहा."डॉगवूडच्या पाठीकडून तो आला. थबकला. तलावाच्या पृष्ठभागाकडे पाहत पेगी सिगरेट ओढत होती. तिची नजर शून्य होती. सिगरेटचा धूर ती यांत्रिकपणे आत घेत होती. नाकपुडीतून, तोंडातून, बाहेर टाकत होती. तिचे काहीतरी फार बिघडले होते का ? आपण तिला विचारावे का ? की तिला ते आक्षेपार्ह वाटेल ? खाजगी गोष्टीत आपण नाक खुपसत आहोत असे वाटेल ? पण त्याचे पाऊल उचलेना ." [२७] निवेदन करताना निवेदनातून व्यक्तिरेखांचा परिचय करून दिला आहे. तो पुढीलप्रमाणे: 'दृष्टव्य' या कथेत रेणुकांची व्यक्तिरेखा "अश्राप बाप आणि आत्यंतिक व्यवहारी आई यांचे अपत्य म्हणजे रेणुका. लाजाळू, खाली मान घालून आपली नेमकी कामे करून टाकणारी, मॅट्रिकपर्यंत शिकलेली, कधी नापास झाली नाही, कधी विशेष चमकली नाही. ना कुरूप ना स्वरूप. स्वभावाने शांत, सोशीक, लाजाळू." [२८]

काही कथांतून पात्राच्या मुखातून लेखक स्वत: बोलत आहे.

म्हणजे पात्राच्या ठिकाणी लेखकच आहे असा भास निर्माण होतो.

उदा. 'स्ट्रॅटेजी' या कथेतील निवेदन पाहता येईल."मी दचकलो. ही कधी समोर येऊन बसली ?"

"म्हटलं, झालं ना लेकीचं कौतुक करून ?"

मी जोरात श्वास घेत म्हटलं ,"मग ? आहेच तशी ती. कशी दिसत होती पोर. बघितलंस ?"

"तुम्ही नीट बघितलंत ना ?"

या संवादावरून लक्षात येते. [२९]

## ३) वातावरण निर्मिती / घटना निर्मिती

कथानकाला पोषक वातावरण निर्मिती केली आहे. पात्रे जेथे राहतात, तेथील स्थळ,काळाचा वापर केला आहे. वातावरण निर्मिती करताना प्रसंग सांगून पात्राच्या तोंडचे संवाद त्यात आल्यामुळे कथेला आकार दिला आहे. उदा.'मनोमनीची अबोलवेडी' या कथेतील वातावरण निर्मिती पाहता येईल, " आईने परसातलं पडवळ शेजारी पोचवायला सांगितलं की, ती पडवळ विजयच्या आईच्या हवाली करून थेट विजयच्या खोलीत डोकावे. अभ्यासात काही अडले की विजयला विचारायचे,शाळेतल्या गमती -जमती, बहिणींच्या तक्रारी सगळे विजयला सांगायचे,विजय एसेस्सीला असताना ती मराठी सहावीत होती. फ्रॉक घालणारी, पाठीवर दोन वेण्या,नाकात काळा दोरा, त्याचा तर विजयला फार राग येई."

" नाकात वेसण कसली घातलेय ग ?"

" वा ! नाक टोचायला नको ? मग चमकी कशी घालणार उद्या ? ती विचारी." [३०]

सभागृहातील वातावरण कसे असते याचे चित्रण 'रात्रंदिवस आम्हा' या कथेत आले आहे. " सभागृहात सैलपणा आला होता. आता तासाभरात कामकाज संपणार होते. सैल मनाने सभासद आरामात बसलेले असताना शेतकरी पक्षाचे दत्ता भगत उभे राहिले, किंचित खाली त्यांनी सभापतींना अभिवादन करून म्हटले," माननीय सभापती, पुरवणी अर्थसंकल्पीय मागणीला माझा विरोध आहे. अर्थखात्याला खरे म्हणजे

एक कवडीही आपण देता कामा नये. असे म्हणत त्यांनी खाली झुकून आपल्या पायातली चप्पल हातात घेऊन हात उंच केला. त्याबरोबर सत्ताधारी पक्षाने गदारोळ उडवला. "[३१]

'भेट' या कथेतील वातावरण निर्मिती "रवीने हात पुढे करुन पेटीतून चिरूट काढला. कात्रीने त्याचे टोक कापले. तोंडातला चिरूट सर्व बाजूंनी लायटरने नीट पेटवला. सिगारची कडवट चव जिभेवर पसरली. सिगारचा कडवटवास खोलीभर पसरला. हातात सिगार घेऊन तो काचेच्या भिंतीशी येऊन उभा राहिला." सविस्तर वर्णन केल्याने कथेत कोठेही खंड पडत नाहीत.[३२] वातावरण निर्मिती करताना घटनांची सांगड घालताना कथेला कोठेही बाधा न येऊ देता रचना केल्यामुळे कथा वाचनीय ठरल्या आहेत. घटनेची निर्मिती करताना त्या घटनेतच न अडकता कथा पुढे चालू राहते. उदाहरण पाहयचे झाले तर 'डेड एन्ड' या कथेतील घटना पाहता येईल." मिली तिच्या आजारी बहिणीकडे इलिंगला तीन दिवस रजा काढून गेली असता जॅक निर्धास्तपणे एका उनाड मैत्रिणीला आपल्या फ्लॅटवर घेऊन आला होता. मिली बहिणीला बरे वाटावे म्हणून एक दिवस आगोदर आली. लॅच की वापरून आत आली. टेबलवर पडलेल्या खरकट्या प्लेटी, दारूचे ग्लास, रिकाम्या बाटल्या, तिच्या बिछान्यात झोपलेली एक कनिष्ठ संस्कृतीची स्त्री, खालच्या कार्पेटवर लोळणारा जॅक. तिचे मस्तक गरगरले न बोलता तिने आपले कपडे बॅगेत भरायला प्रारंभ केला."[३३]

'जर्म' कथेतील अप्पासाहेब पेंडसे हे कोण आहेत हे सांगताना त्यांच्या लेखनाची माहिती देऊन, त्यांची लेखननिर्मिती सांगून त्यांच्या

बद्दल अधिक माहिती दिली जाते. व वातावरण निर्मिती केली जाते. "सत्यव्रत कोणीच नव्हता. याउलट अप्पासाहेब पेंडसे सरस्वतीच्या दरबारातले बिनीचे सरदार होते. कोणीही हेवा करावा अशी पेंडशांची कामगिरी होती."[३४] परदेशातील स्थळांची वर्णने बहुतेक कथांतून आली आहेत. युनिव्हर्सिटी ऑफ फ्लोरिडाचा परिसर, न्यूयॉर्क, अमेरिका, इत्यादी शहरे कथेत आली आहेत. तर काही भारतातील वर्णनेही आली आहेत.'दृष्टव्य' या कथेतील गणेशवाडीचे संस्थानचा उल्लेख आला आहे. तीनशे वर्षांपूर्वी पेशवाईत कृष्णाकाठच्या गणेशवाडीला स्थापन झालेले होते. हा पूर्वी मठ होता. अशा प्रकारची वातावरण निर्मिती कथेतून आली आहे.

पात्रे जेथे राहतात आणि ज्यांच्यामुळे घटन घडतात त्या घटनांना पोषक वातावरण निर्मिती केली गेली आहे. घटनानिर्मिती सहज होते. घटन निर्मितीत जास्त गुंतत बसत नाहीत. घटनेची निर्मिती ही पात्र वातावरण, याला अनुरूप संवाद यामुळे कथेला वेगळेपणा आला आहे. त्यांच्या कथेतील पात्रे उच्चशिक्षित आहेत. परदेशात राहणारी आहेत. त्याचप्रकारची वातावरण निर्मिती करण्याचा अनंत मनोहरांचा प्रयत्न आहे.

### ४) वर्णनशैली

अनंत मनोहरांच्या कथेत वर्णने येतात; पण ते जास्त वर्णनात रमत नाहीत. मोजकी पण परिणामकारक वर्णने आली आहेत. वर्णनशैलीचा वापर करुन वातावरण निर्मिती साधण्याचा प्रयत्न त्यांच्या कथेतून होतो. 'लाट' कथेतील वर्णन "उसळणाऱ्या लाटांचा जोर कमी होत गेला. सागर शांत शांत होत जावा तसे तिचे झाले.कॉफिसाठी

ठेवलेले पाणी उसळत उसळत होते. उकळत होते. त्याकडे शून्य नजरेने पाहत जानकी उभी होती.".[३५] 'रक्त' कथेतील रोझी घरी आल्यावरचे वर्णन कथेत आले आहे." तिचे बुट दाराशी पडले होते. एक मोजा अर्धाबुटाला, अर्धा बाहेर असा लोळत होता. दुसरा रॅकवर उडवलेला होता. ड्रेस सोप्यात, पर्स खुडचीत, हातमोजे टी-पॉयवर. टिपिकल रोझीलाइक. स्टोअर्समध्ये हसतमुखाने चटपटीतपणाने काम करणारी रोझी जणू आपली सर्व एनर्जी स्टोअर्ससाठी राखून ठेवीत असावी." [३६]

कथेत काही ठिकाणी मानसिक स्थितीचे वर्णन केले आहे.'अदिम' या कथेत जॉन हॅरिसनच्या मनस्थितीचे वर्णन आले आहे. "तळ्याच्या पाण्यात झालेली खळबळ शांत व्हावी, त्याच्यावर हारलेलं जाड शेवाळ पुन्हा पसरावे, त्या शेवाळाच्या सायीखाली पाणी झाकले जावे तसे जॉनचे होई.[३७] 'दृष्टव्य' या कथेत स्वामीच्या मनस्थितीचे केलेले वर्णन :" आभाळात जमलेली अभ्रे उडून जावीत असे स्वामींच्या मनातले खिन्नतेचे पराभूत झाल्याच्या अपराधीपणाचे विचार दूर उडून गेले."[३८]

## ५) संवादशैली

कथालेखनात संवादाला अधिक महत्त्व आहे. संवादाशिवाय कथानकाला पूर्णत्व येत नाही. व्यक्तिरेखा जशा महत्त्वाच्या असतात तसे त्यांच्यातील संवादही महत्त्वाचे आहेत. व्यक्ती, घटना याला अनुरूप असे संवाद अनंत मनोहरांच्या कथेत पाहयला मिळतात. संवादात्मकता हे कथेच्या जिवंतपणाचे लक्षण आहे.

'मनोमनीची अबोल वेडी' या कथेतील विजय व दमयंतीचा संवाद पाहता येईल. "अग, पण दोरा कसला घालत्येस ? अस्वल आहेस का तू नाकात दोरा अडकवायला ?"

"अरे, नाक बुजू नये ना म्हणून दोरा घालायचा असतो. पण हे उदाहरण सोडवायचं कसं सांगतोस ?'

"फुटाण्ये, वर्गात बाई शिकवतात, तेव्हा काय तू काचापाणी खेळत असतेस ?"

ती गाल फुगवून म्हणायची, 'आमच्या बाई बोर्डावर उदाहरणं भराभरा सोडवतात. त्या सांगतात कुठं आम्हांला कशी सोडवायची ते ? तू कसं छान शिकवतोस. सांग ना रे, हे कसं सोडवायचं ?'

"शिकवणीची फी काय देशील सांग. फुकट नाही शिकवणार."

"देईन, आज आई चॉकलेट देणार आहे. त्यातलं अर्ध देईन तुला." [३९] 'स्ट्रॅटेजी' मधील अंजूच्या आई-वडलांचा संवाद. अंजूचे वडील म्हणतात, "कशी बिजली आहे नुसती' 'ही तुमची बीज ज्या कुणाच्या घरावर कोसळेल त्याची चूल नाही पेटणार. विजेनं घरं उद्ध्वस्त होतात. लाड कसले करताय तिचे ? असाच संसार करणार का ती ? एवढं तिचं कौतुक करताय. तुम्हांला माझ्याऐवजी अशी वीज मिळाली असती, तर झाला असता तुमचा संसार ..........?" [४०] 'दृष्टव्य' या कथेतील स्वामी व ओंकारचा संवाद पाहिल्यानंतर समाजवास्तव लक्षात येते.

स्वामी म्हणतात, "ओंकार, तुम्ही एक विसरता. सेवा करण्याचा एक आनंद असतोच, ना ? अंगसेवा तर अतिसामान्य माणूसही करू शकतो. नामदेवांची, जनाबाईंची, चोखोबांची भूमिका काय होती ?

ज्ञानियांच्या राजाचा अधिकार वेगळा ; बाकीच्यांना त्यांच्या मार्गाने ईशसेवा कशी करता येणार ?''

''पण स्वामी, आपण थोरा- मोठ्यांची उदाहरणे देत आहात.''

''मी माझ्यासारख्यांबद्दल बोलत होतो.''

''होय, पण तुम्ही असा एक मुद्दा मनाशी आणा की, तुम्ही काय किंवा मी काय, भक्तजनांच्या लेखी आपण म्हणजे ईशप्राप्तीचे माध्यम.''

या संवादांमुळे रूक्षता कमी झाली असून, कथेत जिवंतपणा आला आहे. संवादात्मकता हा अनंत मनोहर यांच्या साहित्याचा महत्त्वाचा गुण आहे.

## ६) व्यक्तिरेखाटन-

अनंत मनोहरांच्या कथांतील व्यक्तिरेखा काही प्रत्यक्ष पात्रे म्हणून येतात, तर काही व्यक्तीचे चित्रण उल्लेख मात्र येतात. काही व्यक्तिरेखा इतक्या ठळक आहेत की, वाचक त्यांना विसरत नाहीत. काही व्यक्तिचित्रण पात्राला पूरक आणि उल्लेख मात्र येतात. अशा व्यक्तिरेखांचे चित्रण कथेत केले आहे. ते त्यांच्या कथेचे विशेष म्हणता येईल. व्यक्तिचित्रण करताना समाजातील अवती-भोवती वावरणाऱ्या स्त्री, पुरुषांची चित्रणे त्यांनी समर्थपणे केली आहेत. व्यक्तीच्या वेशभूषा, लकबी, बोली भाषा इत्यादी गुणविशेषांवरून व्यक्तीचे व्यक्तिचित्रण लक्षात येते आणि ते टिपण्याचे काम कथेतून अनंत मनोहरांनी केले आहे.

'लाट' या कथेतील जानकी ही बॉम्बे युनिटमध्ये व्ही. आय.

पी. होती. ती 'सेल्फमेड' होती. स्वयंभू होती. याच्या त्याच्या आधारावर ती उभी नव्हती. प्रत्येक काम स्वत:ला उत्तमरितीने करता आले पाहिजे असा तिचा हट्ट होता. ती आधुनिक विचारसरणीची आहे. तिच्या समोर थापाथापी चालत नव्हती. ती रसिक होती. तिच्या ठिकाणी विनोदी बुद्धी होती. याचा प्रत्यय भार्गवला आला होता. तिचे व्यक्तिचित्रण करताना असे केले आहे: ''पस्तिशीची सावळी जानकी. सुस्नात. या क्षणी आनंदात असलेली ही जानकी कुणी वेगळी होती. किंचित उभट चेहरा. डाव्या नाकपुडीत हिऱ्याची चमकी. कानांत हिऱ्यांच्या कुड्या. ऑफिसमधली जानकी नि पाठीवर सळसळीत केस मुक्त सोडलेली जानकी या जणू वेगळ्या होत्या.'' ४२

'पेगी' या कथेत पेगीचे व्यक्तिचित्रण रंगविले आहे.

''सोनेरी केसांची घातलेली चटईवेणी, चौकड्यांचा स्कर्ट. त्यावर पांढरा शुभ्र टॉप. निळे डोळे, लाल चुटूक ओठ, अंगासरसा बांधा. साडेपाच फुटांच्या आसपास उंची, पातळ नाकपुड्या, घरघरीत सरळ नाक, नितळ अंग, लालगोरी.'' ४३ ही पेगी धाडसी आहे. तिला तिच्या वडलांसारखे मोठे वकिल व्हायचे आहे. सावत्र बापाला न घाबरणारी पेगी या कथेत भेटते. तशीच तिचा करारी स्वभाव लक्षात येतो. पेगी बॉयफ्रेंडला धक्के मारून बाहेर काढते. अशा पेगीचे व्यक्तिचित्रण कथेत आले आहे.

'मनोमनीची अबोल वेडी' या कथेतील दमयंती ही कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे सांभाळते. वडील वारल्यानंतर कुटुंबाचा भार उचलते. विजयवर प्रेम असूनही ती एका शब्दानेही त्याला बोलत नाही.

त्याच्या सर्व आवडी-निवडी तिला माहीत होत्या. अशा स्त्रीचे चित्रण या कथेत केले आहे. 'वय चोवीस, उंची बहुधा पाच फूट चार इंच, सडपातळ, रंग सावळा, जिवणी लहान, डोळे मोठे, काळेभोर चकचकीत. एका गालाला खळी पडते. विशेषत: हसताना.'[४४]

'भेट' या कथेतील लीला २५ वर्षांनंतर रवीला भेटते. त्यावेळाच्या तिच्या व्यक्तिरेखेचे चित्रण केले आहे. ''उंच ,सडपातळ, धारदार नाक, कानशिलाजवळच्या केसांत रुपेरी छटा, बारीक फुलांची झुळझुळती साडी , चेहरा लांबट, आता चेहऱ्यावर आलेला वयाचा जूनपणा.''[४५] अशी लीला भेटते. लीला रवीला २५ वर्षांनंतरही भेटल्यावरही त्याला (रवीला) स्वत:चे दु:ख सांगत नाही. उलट आपण सुखी जीवनात खुश आहोत असे सांगते. रवीला चांगली मुलगी बघून लग्न कर असा ती सल्ला देते. अशा सत्प्रवृत्तीची स्त्री या कथेत भेटते. 'डेड एन्ड' या कथेतील मिली शांत स्वभावाची आणि मनाने खंबीर आहे. जॅकच्या स्वभावामुळे ती जॅकला सोडून जाते. अशा खंबीर स्त्रीचेही चित्रण कथेत येते. याच कथेत जॅकची मैत्रीण लॉरिसा हिचे व्यक्तिचित्रण रेखाटले आहे. ही लॉरिसा वेस्ट इंडिज आहे. जॅकच्या खेळावर ती प्रेम करते. तिचे कुरळे केस, मोठे डोळे, काळेभोर, चमकदार, शुभ्र दात, काळा पण सतेज वर्ण, उंच आणि सडपातळ, हसतमुख अशी लॉरिसा या कथेत भेटते.'स्ट्रॅट्रेजी' या कथेतील अंजू ही हुशार आहे. बोलकी आहे. तशीच ती रसिकदेखील आहे. तिला चित्रकलेची आवड आहे. तिची कला जपण्याचा ती प्रयत्न करते.

अनंत मनोहरांच्या कथेत आलेली पुरुषांची व्यक्तिचित्रणे ही

महत्त्वाची आहेत. त्यांच्या कथेत येणारी बहुतेक पुरुष पात्रे ही उच्चशिक्षित आहेत. (कर्कोटक) मग तो परदेशात शिकायला गेलेला विलास असू देत. नाहीतर 'रक्त' या कथेतील मेनन असू दे. 'मनोमनीची अबोल वेडी' या कथेतील विजय ही सर्वपात्रे उच्चशिक्षित आहेत.

'मृगया' कथेत आलेला विजय याचे व्यक्तिचित्रण आले आहे. काळा सावळा पण तरतरीत तरुण आहे. तोही बी. ई. करतो. त्याची वृत्ती चौकस आणि स्वभाव बोलका आहे. घरची परिस्थिती गरीब आहे याची त्याला जाणीव आहे. अशा तरुणाचे चित्रण या कथेत येते.

'जर्म' या कथेतील विद्रोही असणारा सत्यव्रत याचेही व्यक्तिचित्रण कथेतून अभिव्यक्त केले आहे. जे जे प्रस्थापित आहे त्याला त्याचा कडाडून विरोध होता. सत्यव्रत नवीन पिढीचा असल्यामुळे त्याची विचारसरणीही आधुनिक आहे. सत्यव्रत वास्तव जीवनात जगणारा तरुण आहे. समाजातील घडामोडी त्याला माहीत आहेत. दलितांचे प्रश्न मांडण्याचा प्रयत्न करणारा खंबीर असा तरुण या कथेत भेटतो.

'दृष्टव्य' या कथेतील ओंकार हा उच्चशिक्षित आहे. संस्कृतमध्ये पीएच. डी. केली आहे. गणेशवाडीचे स्वामीनी त्याला शिक्षणासाठी मदत केली म्हणून त्यांचे ऋण तो मानतो. पण स्वामींची इच्छा असते की ओंकारने गणेशवाडीचे संस्थान चालवावे. त्याला ते पटत नाही. मठातील अनाचार त्याला आवडत नाही. आपण येथे आलोच कसे याचा विचार करणारा ओंकार या कथेत भेटतो.ओंकारचे वर्णन करताना, ''कशी लख्ख बुद्धी, तीव्र स्मरणशक्ती, चोख पाठांतर, शुद्ध उच्चार, उत्तम अभिरुची, आसक्ती टाळलेली रसिकता, उच्चार न करता, अवडंबर

न माजवता मनाची निवृत्तीकडे धाव, गंगालहरी वाचताना त्याला कसे दाटून आले होते. शंकराचार्यांनी पूर्वपक्ष मांडून त्याचे खंडन करायला प्रारंभ केला की, ओंकारचे डोळे तेजाळतात.'' [४६]

**व्यक्तिरेखाटनाचे विशेष**

१) स्त्री व्यक्तिचित्रणाचे रेखाटन करतात हुशार, संयमी स्त्रीचे चित्रण त्यांच्या कथेत आले आहे.

२) त्यांच्या कथेतील स्त्रिया ह्या परिस्थितीला शरण न जाणाऱ्या, खंबीरपणे संकटाला तोंड देणाऱ्या आहेत.

३) अनंत मनोहरांच्या कथेतील स्त्रीला भारतीय आहेत. तशाच परदेशी स्त्रियांचेही व्यक्तिचित्रण समर्थपणे त्यांनी केले आहे.

४) अनंत मनोहरांच्या कथेतील स्त्रिया कलासक्त व रसिक आहेत.

५) अनंत मनोहरांच्या कथेतील स्त्रिया बहुधा उच्चशिक्षित आहेत.

६) स्वतंत्र बुद्धीच्या, विचारांच्या स्त्रियांचे चित्रण अनंत मनोहरांनी केले आहे.

७) कथेत येणाऱ्या स्त्रिया धाडसी आहेत. उदा. 'पेगी','मृगया'.

८) भारतीय संस्कृती जपणाऱ्या स्त्रीचे चित्रण केले आहे. उदा. 'मृगया' कथेतील केशरची आई.

९) भारतीय परंपरेला विरोध असणाऱ्या स्त्रीचे चित्रण. उदा. 'मृगया' .

**पुरुष व्यक्तिचित्रणे विशेष**

१) अनंत मनोहरांच्या कथेतील पुरुष उच्चशिक्षित आहेत.

२) परिस्थितीची जाणीव असणारे तरुण यांचे चित्रण केले आहे.

३) विद्रोही व्यक्तिमत्त्व असणाऱ्या तरुणाचे चित्रण केले आहे.

४) परंपरेला विरोध करणाऱ्या पुरुषांचे व्यक्तिचित्रण केले आहे.

**समारोप**

'कर्कोटक' या कथासंग्रहातील बरीच पात्रे उच्चशिक्षित आहेत, त्यांच्या अधुनिक जीवनशैलीचे चित्रण या कथासंग्रहातून केले आहे. मानवी वृत्ती -प्रवृत्तींचे चित्रण केले आहे. आशय मांडताना सरळ साधी भाषा शैली आहे. अभिव्यक्तिसामर्थ्य पाहताना त्यांच्या कथेतील भाषाशैली, निवेदन शैली, वातावरण निर्मिती, वर्णनशैली या अनुषंगाने अभ्यासले आहे.

**संदर्भ-**


१. मनोहर अनंत, : 'कर्कोटक', मधुराज पब्लिकेशन प्रा. लि. पुणे प्रथमावृत्ती १५ डिसेंबर १९९१, पृ. १२.

२. उ. नि. : पृ. १२.

३. उ. नि : पृ. १३.

४. उ. नि : पृ. १३.

५. उ. नि : पृ. ३७.

६. उ. नि : पृ. ४०.

७. उ. नि : पृ. ५६.

८. उ. नि : पृ. ७३.

९. उ. नि : पृ.९१.

१०. उ. नि : पृ. १२९.

११. उ. नि : पृ. १४८.

१२. उ. नि : पृ. १७९.

१३. उ. नि : पृ. २६,२७.

१४. उ. नि : पृ. ४०.

१५. उ. नि : पृ. ८७.

१६. उ. नि : पृ. ६७.

१७. उ. नि : पृ. ७५.

१८. उ. नि : पृ. ११२.

१९. उ. नि : पृ. ७८.

२०. उ. नि : पृ. १२१.

२१. उ. नि : पृ. १७९.

२२. उ. नि : पृ. १९५.

२३. उ. नि : पृ. ९१.

२४. उ. नि : पृ. १८८.

२५. उ. नि : पृ. ६.

२६. उ. नि : पृ. ५५.

२७. उ. नि : पृ. ६७.

२८. उ. नि : पृ. २०१.

२९. उ. नि : पृ. १७५.

३०. उ. नि : पृ. ८७.

३१. उ. नि : पृ. ११०, १११.

३२. उ. नि : पृ. ४४.

३३. उ. नि : पृ. १५३.

३४. उ. नि : पृ. १२३.

३५. उ. नि : पृ. ३२.

३६. उ. नि : पृ. ५४.

३७. उ. नि : पृ. १४४.

३८. उ. नि : पृ. १८७.

३९. उ. नि : पृ. ८७.

४०. उ. नि : पृ. १७२.

४१. उ. नि : पृ. २०१,२०२.

४२. उ. नि : पृ. ३१.

४३. उ. नि : पृ. ६३.

४४. उ. नि : पृ. ९२.

४५. उ. नि : पृ. ४८.

४६. उ. नि : पृ. १९२.